

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार , 02 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 140 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुप्तीत ठेवण्यात येईल

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com





# परभणीत 'स्थानिक गुन्हे शाखे'ची धडक कारवाई: सराईत घरफोड्या जेरबंद

## ४.३२ लाखांचे सोन्याचे दागिने जप्त, ३ गुन्हे उघड

■ परभणी (प्रतिनिधी)

जिल्ह्यात चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी परभणी पोलीस ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने कारवाई करत एका सराईत घरफोड्याला जालना जिल्ह्यातून जेरबंद केले आहे. त्याच्याकडून ४ लाख ३२ हजार २०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले असून ३ मोठ्या घरफोड्यांचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

### गोपनीय माहितीवरून जालन्यात छापा

पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या आदेशानुसार आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक जिल्ह्यातील चोरीच्या गुन्ह्यांचा शोध घेत होते. दरम्यान, सराईत घरफोडी करणारा आरोपी रमेश आण्णा शिंदे (वय ३० वर्षे, रा. मंगरूळ, ता. घनसांगवी, जि. जालना) हा आपल्या घरी आल्याची पक्की माहिती गोपनीय बातमीदाराकडून मिळाली. वरिष्ठांच्या सूचनेनुसार पथकाने तात्काळ जालन्यातील मंगरूळ येथे जाऊन सापळा रचला आणि आरोपीला ताब्यात घेतले.

### २ साथीदारांसह घरफोड्या केल्याची कबुली

पोलीस खाक्या दाखवून चौकशी केली असता आरोपीने त्याच्या इतर दोन साथीदारांची नावे पोलिसांना सांगितली. १) संजय तुकाराम गायकवाड (रा. भोकरदन) आणि २) अमोल सुरेश पवार (रा. मंगरूळ, जि. जालना) यांच्या मदतीने पालम आणि चुडावा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोड्या केल्याची कबुली आरोपीने दिली.

### ३० ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त

आरोपीच्या ताब्यातून ३०.२० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत, ज्याची बाजारभावाप्रमाणे एकूण किंमत ४,३२,२००/- रुपये आहे.

### या कारवाईमुळे खालील ३ दाखल गुन्ह्यांचा यशस्वी उलगडा झाला आहे

१ पोलीस ठाणे पालम: गु.र.नं. १४५/२०२५ (कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं.)

२ पोलीस ठाणे पालम: गु.र.नं. १४६/२०२५ (कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं.)

३ पोलीस ठाणे चुडावा: गु.र.नं. ९७/२०२५ (कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं.) आरोपीची वैद्यकीय तपासणी करून त्याला जप्त मुद्देमालासह पुढील तपासासाठी पालम पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि चंदनसिंह परिहार, श्रेपोउपनि मधुकर चटटे, तसेच पोलीस अंमलदार सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, रंगनाथ दुधाटे, नेताजी गीते, गजानन क्षीरसागर, हनुमान ढगे आणि विलास बहुरे यांच्या पथकाने पार पाडली.




# दुष्काळ प्रश्नी धनंजय मुंडे मुख्यमंत्र्यांना भेटले

## पीएम किसान व नमो शेतकरी सन्मान चे दोन दोन हप्ते तातडीची मदत म्हणून वितरीत करण्याची मागणी

### शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत व अन्य उपाययोजनांवर चर्चा

■ मुंबई (प्रतिनिधी)

राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून शेतीपिकांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे होऊन शेतकऱ्यांना मदत मिळायला काही कालावधी लागेल, तोपर्यंत केंद्र सरकारच्या पीएम किसान योजना व राज्य सरकारच्या नमो शेतकरी सन्मान निधी योजना यामधून तातडीच्या मदतीसाठी किमान सर्व पात्र शेतकऱ्यांना दोन हफ्ते एकत्रितपणे वितरीत करण्यात यावेत, जेणेकरून कोलमडलेल्या शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळेल, अशी मागणी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे पत्राद्वारे केली आहे.

महाराष्ट्रात लागू करण्यात आलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करण्यात यावी, यांसह विविध प्रश्नी माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ. धनंजय मुंडे यांनी आज मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले.

मागील आठवड्यात परळी - अंबाजोगाई तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील पाहणी केल्यानंतर शेतकऱ्यांशी संवाद साधत धनंजय मुंडे यांनी आपण लवकरच मुख्यमंत्र्यांना भेटून शेतकऱ्यांना तातडीच्या आर्थिक मदत व अन्य उपाययोजनांबाबत मागणी करणार असल्याचे सांगितले होते.

पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा यांसह



जलसंधारणाची कामे आदींबाबत शासन प्राधान्याने नियोजन करत असून, शेतकरी - शेतमजुरांना उभे करण्यासाठी विविध उपाययोजना व सर्वतोपरी मदत करण्याबाबत धनंजय मुंडे यांनी यावेळी मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत सकारात्मकता दर्शविली आहे.

# कल्याणम् एज्युकेअरच्या पुणे यांच्या वतीने परळीचे मुख्याध्यापक लक्ष्मण वाकडे यांना 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार-२०२६' जाहीर

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी कल्याणम् एज्युकेअरच्या पुणे यांच्या वतीने विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत वर्ष २०२६ चा मानाचा 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार' परळी येथील श्री वाकडे लक्ष्मण ईश्वरराव यांना जाहीर झाला आहे.

श्री लक्ष्मण ईश्वरराव वाकडे हे बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील नवीन प्रा. शा. थर्मल या शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या महत्त्वपूर्ण आणि मार्गदर्शक कार्याची दखल घेऊन त्यांची या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



### मुंबईत होणार भव्य सोहळा

'शिक्षणाचा गौरव हा समाजाचा अभिमान' हे ब्रीद घेऊन आयोजित करण्यात आलेला हा पुरस्कार प्रदान सोहळा मुंबई येथे पार पडणार आहे. एका भव्य व दिमाखदार सोहळ्यात श्री वाकडे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार अधिकृतपणे प्रदान करण्यात येणार आहे. या यशाबद्दल श्री लक्ष्मण वाकडे यांच्यावर शिक्षण क्षेत्रातून, तसेच मित्रपरिवार आणि सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या भावी वाटचालीस खुप खूप शुभेच्छा.

# स्वातंत्र्यसैनिकाचा खोटा पाल्य असल्याचा आरोप

## विस्तार अधिकारी मनोरंजन धस यांच्या विरोधातील तक्रार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे वर्ग

■ बीड प्रतिनिधी :

बीड जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेले तथा अंबाजोगाई येथील विस्तार अधिकारी मनोरंजन रावसाहेब धस यांनी नोकरी मिळविताना स्वातंत्र्यसैनिकाचा खोटा पाल्य असल्याचे भासवून नोकरी संपादित केल्याचा आरोप करीत आष्टी येथील संदीप अरुण हंबडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार केली आहे. या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर अर्ज पुढील नियमानुसार कार्यवाहीसाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे वर्ग केला आहे.

संदीप हंबडे यांनी ७ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज सादर करून संबंधित प्रकरणात चौकशी करून मनोरंजन धस यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याबाबत योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली होती. या तक्रारीत धस यांनी सुमारे २० वर्षांपूर्वी स्वातंत्र्यसैनिकाचा पाल्य असल्याच्या आधारे नोकरी मिळविल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल-१ विभागाचे तहसीलदार सुधाकर टाक यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र पाठविले आहे. अर्जदाराचा अर्ज संबंधित कार्यालयाशी निगडित असल्याने तो कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणात संबंधित नियम, अद्ययावत शासनादेश तसेच प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यास न्यायालयाचे आदेश यांचा विचार करून नियमानुसार उचित कार्यवाही करावी आणि त्याबाबत अर्जदारास लेखी कळवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाने दिले आहेत. त्यामुळे आता जिल्हा परिषद प्रशासनाकडून या तक्रारीवर कोणती कार्यवाही केली जाते, याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, संबंधित विस्तार अधिकारी मनोरंजन रावसाहेब धस यांच्यावरील आरोपांची अद्याप अधिकृत चौकशी होऊन निष्कर्ष समोर आलेला नसल्याने तक्रारीतील आरोपांची सत्यता चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे.



# संपादकीय

## हंगेरीतील सत्तांतराचा अमेरिकेला धक्का

युरोपमधील हंगेरी या छोट्या देशातील ताज्या निवडणूक निकालांचे पडसाद केवळ त्या देशापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर त्याचे प्रतिध्वनी थेट अमेरिकेपर्यंत ऐकू येत आहेत. पंतप्रधान व्हिक्टर ऑर्बन यांचा पराभव हा जागतिक राजकारणातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. कारण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह अनेक प्रभावशाली नेते ऑर्बन यांचे उघड समर्थक राहिले आहेत. हा पराभव काय सांगतो?

हंगेरीचे मावळते पंतप्रधान व्हिक्टर ऑर्बन यांनी सत्तेचा वापर करून माध्यमे, न्यायव्यवस्था आणि निवडणूक यंत्रणा यांच्यावर प्रभाव टाकत जवळपास सोळा वर्षे सत्तेवर पकड कायम ठेवली. त्यांच्यात आणि ट्रम्प यांच्या राजकीय कार्यक्रमपत्रिकेत साम्य आढळते, ही बाबही अनेकांच्या चर्चेचा विषय ठरली होती. ट्रम्प यांनी ऑर्बन यांच्या पुनर्निवडीसाठी जोरदार पाठिंबा दर्शवला होता. अगदी इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवरही अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांना हंगेरीच्या बुडापेस्ट येथे पाठवून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. तथापि, ऑर्बन यांच्या पराभवाने वेगळेच वास्तव अधोरेखित केले. जागतिक संघर्षांच्या छायेत परदेशातील राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकण्याची अमेरिकेची क्षमता मर्यादित होत चालली आहे. या निकालाचे व्यापक परिणाम होणार हे निश्चित. ऑर्बन हे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचे युरोपमधील निकटचे सहयोगी मानले जात होते. त्यांनी युरोपीय महासंघाकडून युक्रेनला मिळणाऱ्या मदतीत अडथळे निर्माण केले होते. त्यांच्या पराभवामुळे युरोपीय राजकारणात नव्या घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, या निकालाचे स्वागत अमेरिकेतील दोन्ही प्रमुख पक्षांकडून करण्यात आले. काही नेत्यांनी तर इतर लोकशाही देशांच्या निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करण्याच्या धोरणावरच टीका केली. लोकशाही व्यवस्थेत अखेरीस जनतेचीच भूमिका निर्णायक ठरते, असा व्यापक संदेश यावरुन जातो. राजकीय तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या अस्थिर जागतिक वातावरणात सत्ताधाऱ्यांविरोधातील असंतोष वाढत आहे. आर्थिक अडचणी, महागाई आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे मतदार बदलाची मागणी करत आहेत. हंगेरीतील निकाल याच व्यापक प्रवाहाचा भाग मानला पाहिजे. लोकशाहीमध्ये कुणीही 'अपराजित' नसतो. वेळ आल्यास जनता सत्तांतर घडवून आणते, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. ट्रम्प आणि पुतीन यांच्यासारख्यांचा पाठिंबा, हंगेरीतील माध्यमे ताब्यात, सत्तेचे केंद्रीकरण असे सर्व प्रकार असतानाही जनतेने ऑर्बन यांची १६ वर्षांची सत्ता उलथवून टाकली. जनतेला गृहीत धरणे चुकीचे असते, हा संदेश हंगेरीच्या निवडणुकीने जगाला दिला. हंगेरीच्या राजकारणात नुकत्याच घडलेल्या सत्तांतराने युरोपीय राजकीय पटावर एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. जवळपास १६ वर्षे सत्तेवर असलेल्या व्हिक्टर ऑर्बन यांच्या नेतृत्वाखालील फिडेज या पक्षाला पराभवाचा धक्का बसणे हा केवळ निवडणूक निकाल नसून, दीर्घकाळ एकाच विचारसरणीच्या वर्चस्वाला मिळालेला जनतेचा प्रतिसाद मानावा लागेल. ऑर्बन यांच्या कारकिर्दीमध्ये 'बिनउदारमतवादी लोकशाही' ही संकल्पना पुढे आली. राष्ट्रवाद, सांस्कृतिक परंपरा आणि स्थलांतरविरोधी भूमिका या त्रिसूत्रीवर त्यांनी आपली राजकीय घडी बसवली. युरोपीय महासंघासोबतचे त्यांचे संबंध अनेकदा तणावपूर्ण राहिले. न्यायव्यवस्थेतील हस्तक्षेप, माध्यम स्वातंत्र्यावरील निर्बंध आणि नागरी स्वातंत्र्यांवरील मर्यादा यामुळे हंगेरीवर वारंवार टीका झाली; मात्र देशांतर्गत पातळीवर त्यांनी आर्थिक स्थैर्य, रोजगार आणि पारंपरिक मूल्यांचे रक्षण यांची मांडणी करून जनाधार टिकवून ठेवला. या निवडणुकीत विरोधकांनी प्रथमच एकसंध आघाडी उभी केली. विविध विचारधारांचे पक्ष एकत्र येऊन सत्ताधारी व्यवस्थेविरुद्ध लढले. या नव्या राजकीय पर्यायाने मतदारांना 'पर्याय' उपलब्ध करून दिला, जो गेल्या अनेक वर्षांमध्ये नव्हता. दीर्घकाळ एकाच पक्षाच्या वर्चस्वामुळे निर्माण झालेली अस्वस्थता, सत्तेचे केंद्रीकरण आणि पर्यायांचा अभाव या घटकांनी मिळून बदलाची पायाभरणी केली.

# शिक्षण सेवकांच्या मानधनात दरमहा २० हजारांची वाढ करा !

## कृती समितीची राज्य शासनाकडे मागणी; काम नियमित शिक्षकांप्रमाणे आणि मानधन मात्र अत्यल्प

■ पुणे (प्रतिनिधी):

**महाराष्ट्रातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या हजारो शिक्षण सेवकांच्या मानधनात दरमहा ₹२०,००० ची वाढ करण्यात यावी, अशी मागणी 'शिक्षण सेवक मानधनवाढ कृती समिती, महाराष्ट्र राज्य' च्या वतीने राज्य शासनाकडे करण्यात आली आहे. महागाईचा वाढता आलेख आणि नियमित शिक्षकांइतक्याच पार पाडाव्या लागणाऱ्या जबाबदाऱ्या विचारात घेता, शासनाने स्वतः ठरवलेल्या पुनरावलोकनाच्या धोरणानुसार त्वरित अंमलबजावणी करावी, असा सूर या मागणीमागे आहे.**

### 22 सप्टेंबर 2022 च्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची वेळ

■ शासनाच्या दि. २२ सप्टेंबर २०२२ रोजी तत्कालीन मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मानधनाचा किमान चार वर्षांतून एकदा पुनरावलोकन (Review) करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर ९ फेब्रुवारी २०२३ रोजी मानधनात सुधारणा करण्यात आली असली, तरी गेल्या काही वर्षांत घरभाडे, प्रवास, अन्नधान्य, आरोग्य व दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे सध्याचे मानधन अत्यंत अपुरे पडत असून, मानधनवाढीची पुनर्विचार प्रक्रिया शासनाने आतापासूनच सुरू करावी, अशी आग्रही मागणी समितीने केली आहे.

### काम नियमित शिक्षकांसारखे, मग मानधन अत्यल्प का?

■ अध्यापनासोबतच परीक्षा कामकाज, मूल्यमापन, विविध शासकीय उपक्रम, विद्यार्थी-पालक मार्गदर्शन, शालेय अभिलेख, सर्वेक्षणे आणि प्रशासकीय कामकाज अशा सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या शिक्षण सेवक पार पाडत आहेत. "काम नियमित शिक्षकांप्रमाणे आणि मानधन मात्र अत्यल्प, ही विसंगती दूर होणे अत्यंत गरजेचे आहे," अशी भूमिका कृती समितीने मांडली आहे.

### राज्यभर तीव्र पाठपुरावा करणार

■ या संदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री, शालेय शिक्षण मंत्री, मुख्य सचिव आणि शिक्षण आयुक्तांना निवेदने पाठवण्यात येत असून, संपूर्ण राज्यात या मागणीसाठी व्यापक पाठपुरावा केला जाणार आहे.

> विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणाऱ्या शिक्षण सेवकांचे वर्तमान सुरक्षित करणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. शासनाने मानधन पुनरावलोकनाचे तत्त्व मान्य केले असल्याने आता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून न्याय द्यावा.
> — **संदीप भोसले** (राज्य समन्वयक, शिक्षण सेवक मानधनवाढ कृती समिती)

> दुर्गम भागात, वाड्या-वस्त्यांवर जाऊन ज्ञानदानाचे कार्य करणारे शिक्षणसेवक शिक्षणव्यवस्थेचा आधारस्तंभ आहेत. मर्यादित मानधनामुळे त्यांना आर्थिक व मानसिक ताण सहन करावा लागतो. सन्मानजनक जीवन जगता यावे यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा.
> — **प्रा. शितल शिवाजी गोरे** (शिक्षणसेवक)



# मतदार यादी पुनरीक्षण 'वगळण्याची' नव्हे, 'समाविष्ट करण्याची' प्रक्रिया; पदवीधर निवडणुकीची तयारी जोरात

## विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांनी घेतला आढावा

■ **बीड, १ ऑक्टोबर :**

मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) ही मतदारांना वगळण्याची प्रक्रिया नसून, पात्र मतदारांना यादीत समाविष्ट करून घेणारी महत्त्वाची प्रक्रिया आहे, असे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी SIR कार्यक्रम आणि औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला.

### SIR : आतापर्यंतची स्थिती

जिल्ह्यातील ६ विधानसभा मतदारसंघांत २१.९३ लाख मतदारांना गणना अर्ज वाटण्यात आले. २४ ऑगस्टच्या अहवालानुसार १९.५३ लाख (८९.०४ टक्के) अर्जांचे डिजिटायझेशन झाले. उर्वरित २,४०,४७७ मतदार (१०.९६ टक्के) 'संकलित न होणारे' आहेत. त्यात मृत ५०,९१३, पत्त्यावर न सापडणारे/गैरहजर ५६,८८६, कायमस्वरूपी स्थलांतरित १,०३,३३४, इतर ८२८ आणि इतरत्र नोंदणी झालेले २८,५१६ मतदार आहेत. बीड मतदारसंघात हे प्रमाण सर्वाधिक १९.५१ टक्के आहे. त्यापाठोपाठ परळी १२.३०, केज ११.०५ आणि माजलगाव ९.५३ टक्के आहे. आष्टीत सर्वात कमी, ६.३८ टक्के आहे.

मतदान केंद्रांच्या सुसूत्रीकरणानंतर केंद्रांची संख्या २,४१६ वरून २,३९३ झाली. १,३०० पेक्षा जास्त मतदार असलेल्या १५ ठिकाणी नवी केंद्रे, तर २२ केंद्रांचे स्थान बदलण्यात आले आहे. जिल्ह्यात



राजकीय पक्षांचे ८,१०१ बूथ लेव्हल एजंट (BLA) नियुक्त झाले आहेत. सध्या नोटीस व सुनावणीचा टप्पा सुरू आहे. एकूण १,५२,१७९ नोटिसांपैकी १,०५,९७८ बजावण्यात आल्या असून ४६,१८८ बजावणे बाकी आहे. आतापर्यंत ९,३६५ सुनावण्या पूर्ण झाल्या आहेत.

### पुढील टप्पे

- **दावे व हरकती दाखल करण्याची मुदत : १२ ऑक्टोबर**
- **नोटीस व दावे-हरकती निकाली काढणे : १० नोव्हेंबरपर्यंत**
- **अंतिम मतदार यादी प्रसिद्धी : १६ नोव्हेंबर**

### पदवीधर मतदारसंघ निवडणूक

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीची अधिसूचना २९ सप्टेंबरला निघाली. नामनिर्देशनाची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, छाननी ७ ऑक्टोबर आणि माघार ९ ऑक्टोबर आहे. मतदान २३ ऑक्टोबरला सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होईल, तर मतमोजणी २७ ऑक्टोबरला होईल. निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करायची आहे.

बीड जिल्ह्यात १२ जानेवारीच्या यादीनुसार ५४,२०६ पदवीधर मतदार आहेत (४२,२८२ पुरुष, ११,९२२ महिला, २ इतर). त्यात सर्वाधिक १४,०६२ मतदार बीड तालुक्यात आहेत. नवीन नोंदणीसाठी ४,२६१ अर्ज आले असून २,६३० मंजूर, १,५७३ प्रक्रियेत आणि ५८ नामंजूर आहेत. पडताळणीत १,१२२ मतदार वगळण्यात आले आहेत. जिल्ह्यात १२७ मतदान केंद्रे प्रस्तावित आहेत, त्यातील सर्वाधिक ३२ बीड तालुक्यात आहेत.

**आचारसंहिता :** आचारसंहितेच्या पहिल्या ७२ तासांत शासकीय, सार्वजनिक व खासगी मालमत्तेवरील मिळून सुमारे ४,८७४ विद्रूपीकरणाच्या प्रकरणांची नोंद झाली. त्यापैकी ४,६८५ ठिकाणी ते काढण्यात आले आहे. माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती, खर्च नियंत्रण, अवैध दारू प्रतिबंध अशा विविध कक्षांवर नोडल अधिकारी नेमण्यात आले आहेत.

# राज्याच्या विकासाला मोठी गती! इन्व्हेस्टमेंट समिटमध्ये 8 .57 लाख कोटींचे सामंजस्य करार

■ **मुंबई : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राला देशासह जागतिक स्तरावर गुंतवणुकीचे प्रमुख केंद्र बनवण्याच्या उद्देशाने 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र' या नव्या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. गुंतवणूकदारांना जमीन, वीज, पायाभूत सुविधा, विविध परवानग्या आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय साधला जाणार आहे. प्रकल्प सुरू झाल्यानंतर त्याला आवश्यक ते सहकार्य देण्याची जबाबदारी शासनाची असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र'च्या शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह विविध मंत्री, वरिष्ठ अधिकारी, उद्योजक आणि गुंतवणूकदार उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत 67 प्रस्तावित सामंजस्य करार करण्यात येणार असून, त्यातून 8.5 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक होण्याची शक्यता आहे. तसेच 3 लाखांहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. डेटा सेंटर, सेमीकंडक्टर, अक्षय ऊर्जा, उत्पादन, एरोस्पेस, संरक्षण, आरोग्यसेवा आणि कृषीप्रक्रिया अशा विविध क्षेत्रांचा या प्रस्तावांमध्ये समावेश आहे. या गुंतवणुकीचा फायदा केवळ मोठ्या कंपन्यांपुरता मर्यादित न राहता स्थानिक लघु आणि मध्यम उद्योग, पुरवठादार, युवक तसेच शेतकऱ्यांना मिळावा, यावरही मुख्यमंत्र्यांनी भर दिला. मोठ्या उद्योगांनी स्थानिक कंपन्यांना आपल्या पुरवठा साखळीत संधी देण्याचे आवाहन त्यांनी केले. चंद्रपूर, वर्धा, नागपूर, गोंदिया, नाशिक, जळगाव, धुळे, छत्रपती संभाजीनगर, जालना, पुणे, अहिल्यानगर, रत्नागिरी, पालघर आणि मुंबई महानगर प्रदेशात गुंतवणुकीचे प्रस्ताव आहेत. त्यामुळे राज्याच्या विविध भागांत रोजगार आणि विकासाच्या संधी निर्माण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. 2030 पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था 1 ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असून, त्यासाठी उद्योग, कौशल्य, संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्राला चालना देण्यावर भर दिला जाणार आहे.



# साईभक्त तथा उद्योजक रवींद्र पापा गित्ते यांच्या हस्ते स्व.लक्ष्मण पवार स्मृती क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण

## युवकांनी क्रीडा क्षेत्रातही आपले उज्ज्वल भविष्य घडवावे-साईभक्त तथा उद्योजक रवींद्र पापा गित्ते








■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-

"स्वर्गीय लक्ष्मण पवार यांच्या स्मरणार्थ आयोजित या भव्य क्रिकेट स्पर्धेत सहभागी होऊन खेळाडूंचा उत्साह वाढविता आला, याचा मला मनापासून आनंद आहे. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात माझ्या हस्ते विजेत्या संघांना बक्षिसे देताना खेळाडूंच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहून समाधान वाटले. ग्रामीण भागातील युवकांमध्ये क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्याची मोठी क्षमता आहे. त्यांना प्रोत्साहन व योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी अशा उपक्रमांना माझे नेहमीच सहकार्य राहील. स्वर्गीय लक्ष्मण पवार यांच्या स्मृती जपत आयोजित केलेल्या या स्पर्धेचे आयोजन कौतुकास्पद आल्याचे प्रतिपादन साईभक्त तथा उद्योजक रवींद्र पापा गित्ते यांनी केले.

स्वर्गीय लक्ष्मण पवार यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी साईभक्त तथा उद्योजक रवींद्र पापा गित्ते यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. "ग्रामीण भागातील युवकांमध्ये क्रीडा कौशल्याची मोठी क्षमता असून, अशा स्पर्धांमधून खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळते. स्वर्गीय लक्ष्मण पवार यांच्या स्मृती जपत आयोजित केलेली ही स्पर्धा कौतुकास्पद आहे. सर्व खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करावी," असे प्रतिपादन रवींद्र पापा गित्ते यांनी केले.

"खेळाडूंनी जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर आपल्या क्षेत्रात यश संपादन करावे. ग्रामीण भागातील युवकांमध्ये मोठी क्रीडा क्षमता आहे. त्यांना योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते निश्चितच मोठी कामगिरी करू शकतात. स्वर्गीय लक्ष्मण पवार यांच्या स्मरणार्थ आयोजित या क्रिकेट स्पर्धेत सहभागी होऊन खेळाडूंचा उत्साह वाढविता आला, याचा आनंद आहे. अशा क्रीडा उपक्रमांना माझे नेहमीच सहकार्य राहील. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंचे रवींद्र पापा गित्ते यांनी अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

स्वर्गीय लक्ष्मण पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला खेळाडू तसेच ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपस्थितांची मने जिंकली. विजेत्या संघांसह सहभागी सर्व खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी सरपंच करण पवार, कृष्णा मुंडे, कल्याण गित्ते, संतोष गित्ते यांच्यासह ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे उपस्थितांनी कौतुक केले.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# एमआयटीत जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा

**लातूर | प्रतिनिधी**

जागतिक फार्मासिस्ट दिन व राष्ट्रीय फार्मसी सप्ताह महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासिटिकल सायन्सेस लातूर येथे जनजागृती रॅली, फार्मसीस्ट ओथ, सायंटिफिक रांगोळी स्पर्धा व पोस्टर प्रेसेंटेशन यासह विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास लातूर एमआयटी मेडिकल कॅम्पस मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री. मधुकर गुट्टे यांची प्रमुख उपस्थिती होती.

फार्मासिस्टची आरोग्य सेवेतील महत्त्वपूर्ण भूमिका आणि समाजातील योगदान या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी शहरात भव्य जनजागरण रॅली काढून औषधाचा योग्य व सुरक्षित वापर, अँटीबायोटिक्स जबाबदारीने वापर करणे आणि फार्मासिस्टचे समाजातील महत्त्व आणि जबाबदारी याबद्दल जनजागृती केली. यावेळी कु. प्रगती इंगोले यांनी सर्व विद्यार्थ्यांना फार्मासिस्टची शपथ दिली.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून अँटिबायोटिकचा दुष्परिणामांची जनजागृती केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैजिनाथ डिग्गे यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर फार्मासिस्टचे अनन्यसाधारण महत्व अधोरेखित करून भविष्यात जबाबदार फार्मासिस्ट बनण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दुर्गा किर्दंत व वैष्णवी कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. आदित्य देशमुख, प्रा. सुचिता खंदाडे, प्रा. सरोज काळजाते, प्रा. सय्यद असलम, प्रा. सोनल साळुंखे, प्रा. नेहा पाटील, प्रा. चैतन्य शिरसाठ, प्रा. प्रतीक ढाकणे, प्रा. बिराजदार, प्रा. दिव्या उगिले, तसेच ओमकार भिसे, तुकाराम केंद्रे, विशाल हल्लाळे, बाळू हलकांचे, कातकडे, साखरे, रवी राठोड इत्यादींनी परिश्रम घेतले.




# शेतकरी आक्रोश! धामणगाव येथे रास्ता रोको आंदोलन - शेतकऱ्यांच्या हक्काच्या मदतीसाठी एल्गार

**प्रतिनिधी | सोपान पगारे**

दुष्काळाने होरपळलेल्या आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आज धामणगाव येथे रास्ता रोको आंदोलन करून जोरदार एल्गार केला. शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये तातडीची मदत, शेतमजुरांसाठी २५ हजार रुपये मदत, सर्व प्रकारच्या शुल्क माफी व हॉस्टेल-मेसचा खर्च शासनाने करावा, तसेच चाऱ्यासाठी थेट अनुदान द्यावे या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून संतप्त शेतकऱ्यांनी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे पिके, विहीर, घरे व दुकाने यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मात्र आजपर्यंत शासनाकडून नुकसानभरपाई मिळालेली नसल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. प्रलंबित नुकसानभरपाई तातडीने देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.



**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या -**

**- दुष्काळी परिस्थितीमुळे हेक्टरी १ लाख रुपये तातडीची मदत द्यावी**

**- शेतमजुरांना २५ हजार रुपये आर्थिक मदत करण्यात यावी**

**- शेतीसंबंधी सर्व शुल्क माफी व विद्यार्थी हॉस्टेल-मेस खर्च शासनाने करावा**

**- चाऱ्यासाठी थेट अनुदान तातडीने जाहीर करावे**

**- अतिवृष्टीतील पिके, विहीर, घर व दुकानांच्या नुकसानाची प्रलंबित भरपाई त्वरित द्यावी**

हे आंदोलन राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. युवक तालुकाध्यक्ष विजय गाढवे यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ते मेहबूब भाई शेख,युवक जिल्हाध्यक्ष सतीश शिंदे, तालुकाध्यक्ष सुनील नाथ, ज्येष्ठ नेते अण्णासाहेब चौधरी, राज्य युवक सचिव रिझवान शेख, जिल्हा युवक कार्याध्यक्ष राहुल काकडे, युवा नेते भाऊसाहेब मेटे, संजय थोरवे, जगन्नाथ धोबळे तसेच मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

"शेतकरी भीक मागत नाही, हक्काची मदत मागत आहे" अशी घोषणा देत आंदोलकांनी धामणगाव-आष्टी रस्त्यावर बसून तासभर रास्ता रोको केला.



# खामगाव शिवारात दुष्काळग्रस्त सोयाबीन पिकांचे कृषी विभागाकडून पंचनामे सुरू

**सिरसाळा| प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील खामगाव शिवारात दुष्काळी परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या सोयाबीन पिकांचे कृषी विभागाकडून पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. पावसाअभावी सोयाबीन पिकांवर मोठा परिणाम झाला असून, शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

कृषी विभागाच्या पथकाकडून शेतशिवारात प्रत्यक्ष पाहणी करून पिकांच्या नुकसानीची नोंद घेतली जात आहे. पंचनाम्याच्या आधारे शासनाकडून मिळणाऱ्या मदतीसाठी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, नुकसानग्रस्त सर्व शेतकऱ्यांच्या पिकांचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार मदत मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# अहिंसा : माणुसकीची सर्वोच्च भाषा

२ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून जगभर पाळला जातो. संयुक्त राष्ट्र महासभेने १५ जून २००७ रोजी दरवर्षी २ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला. अहिंसेचा संदेश शिक्षण आणि जनजागृतीच्या माध्यमातून व्यापक समाजापर्यंत पोहोचविणे, तसेच शांतता, सहिष्णुता, परस्पर समज आणि अहिंसेची संस्कृती विकसित करणे हा या दिनामागील प्रमुख उद्देश आहे. संयुक्त राष्ट्रांच्या ठरावात अहिंसा, सहिष्णुता, मानवी हक्क, मूलभूत स्वातंत्र्य, परस्पर समज आणि विविधतेचा आदर ही मूल्ये परस्परांशी जोडलेली असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे हा दिवस केवळ स्मरणाचा दिवस न राहता हिंसेऐवजी संवाद, संयम आणि परस्पर सन्मान स्वीकारण्याचा संकल्प करण्याची संधी ठरतो.

अहिंसा म्हणजे केवळ मारहाण न करणे किंवा शस्त्रांचा वापर टाळणे एवढाच मर्यादित अर्थ नाही. अहिंसा ही मन, वाणी आणि कृती यांना जोडणारी जीवनदृष्टी आहे. मनात द्वेष, सूड, तिरस्कार आणि दुसऱ्याला कमी लेखण्याची भावना वाढू न देणे हे तिचे पहिले पाऊल आहे. हिंसेची सुरुवात अनेकदा कृतीतून होत नाही; तिची बीजे विचारांत रुजतात. एखाद्याविषयी सतत तिरस्कार बाळगणे, त्याला शत्रू समजणे किंवा त्याच्या अस्तित्वालाच नाकारणे यामुळे पुढे कठोर शब्द आणि आक्रमक कृती जन्म घेऊ शकतात. म्हणून अहिंसेची खरी सुरुवात अंतर्मनाच्या शुद्धीकरणातून होते. स्वतःच्या रागावर, द्वेषावर आणि प्रतिक्रियांवर नियंत्रण ठेवणे म्हणजे अहिंसेच्या दिशेने जाणे होय.

अहिंसेचा सर्वाधिक दैनंदिन संबंध वाणीशी येतो. शब्दांना शरीर नसते, पण ते मनावर खोल जखमा करू शकतात. शिवीगाळ, धमकी, उपहास, अपमानास्पद भाषा किंवा जाणीवपूर्वक दुसऱ्याच्या भावनांना दुखावणे ही मानसिक हिंसेची रूपे आहेत. त्यामुळे अहिंसक वाणी म्हणजे केवळ गोड बोलणे नव्हे; तर सत्य आणि असहमती व्यक्त करतानाही समोरच्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा आदर करणे होय. एखाद्याच्या विचारांचा विरोध करता येतो, चुकीच्या कृतीवर टीका करता येते आणि कठोर प्रश्नही विचारता येतात; मात्र त्यासाठी व्यक्तीचा अपमान करण्याची गरज नसते. विचारांशी असहमती असली तरी व्यक्तीचा सन्मान राखणे हीच अहिंसक संवादाची खरी कसोटी आहे.

अहिंसा ही दुर्बलतेची नव्हे, तर आत्मसंयमाची खूण आहे. रागाच्या क्षणी तात्काळ प्रतिक्रिया न देणे, अपमानाला प्रतिहल्ल्याने उत्तर न देणे आणि संघर्षाच्या वेळी विवेकाने निर्णय घेणे यासाठी मनाची ताकद आवश्यक असते. हिंसक प्रतिक्रिया क्षणिक समाधान देऊ शकते; परंतु त्यामुळे संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता असते. अहिंसा मात्र संघर्षाच्या मुळाशी जाण्याची संधी देते. मतभेद का निर्माण झाला, समोरच्या व्यक्तीची भूमिका काय आहे आणि तो प्रश्न संवादातून कसा सोडविता येईल, याचा विचार करण्यास ती प्रवृत्त करते. त्यामुळे अहिंसा म्हणजे निष्क्रिय राहणे नव्हे, तर संयमित आणि सजग पद्धतीने कृती करणे होय.

माणसामाणसांत मतभेद असणे स्वाभाविक आहे. प्रत्येकाची विचारसरणी, अनुभव, गरजा आणि जीवनदृष्टी वेगळी असते. समस्या मतभेदांत नसते; ती मतभेदांचे रूपांतर द्वेष आणि वैरात झाल्यावर निर्माण होते. अहिंसा मतभेद नष्ट करण्याचा आग्रह धरत नाही, तर त्यांना मानवी चौकटीत हाताळण्याची शिकवण देते. दुसऱ्याचे म्हणणे ऐकणे, स्वतःच्या भूमिकेचा पुनर्विचार करण्याची तयारी ठेवणे, सामंजस्याचा मार्ग शोधणे आणि मतभिन्नतेनंतरही परस्पर सन्मान टिकविणे ही अहिंसक वृत्तीची लक्षणे आहेत. त्यामुळे अहिंसा ही सर्वांनी एकमताने राहण्याची सक्ती नसून विविध मतांना सहअस्तित्वाची जागा देणारी मूल्यव्यवस्था आहे.

अहिंसा आणि क्षमा यांचेही अतूट नाते आहे. क्षमा म्हणजे अन्याय किंवा चुकीचे वर्तन योग्य ठरविणे नव्हे. चुकीचा विरोध करतानाही सूडभावना टाळता येते. एखाद्याने आपल्याशी चुकीचे वर्तन केले म्हणून त्याच्यावर तसाच अन्याय करण्याची आवश्यकता नसते. सूड संघर्षाची साखळी पुढे नेतो, तर क्षमा ती साखळी तोडण्याची शक्यता निर्माण करते. अर्थात, क्षमेसोबत विवेक आवश्यक आहे. अन्यायाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आवश्यक सीमा आणि उपाय कायम ठेवूनही मनातील वैर कमी करता येते. त्यामुळे क्षमा ही अहिंसेच्या भावनिक आणि नैतिक शक्तींपैकी एक आहे.

अहिंसेच्या केंद्रस्थानी करुणा आणि सहवेदना आहेत. दुसऱ्याच्या वेदना समजून घेणे, त्याच्या परिस्थितीचा विचार करणे आणि त्याच्याकडे संवेदनशीलतेने पाहणे म्हणजे करुणा. जेव्हा माणूस समोरच्याला केवळ विरोधक म्हणून न पाहता त्याच्याही भावना, भीती, अपेक्षा आणि दुःख आहेत हे स्वीकारतो, तेव्हा हिंसेची मानसिकता कमकुवत होते. अहिंसा माणसाला स्वकेंद्रिततेपासून सहवेदनेकडे घेऊन जाते. म्हणूनच करुणा, सहानुभूती आणि संवेदनशीलता या अहिंसेच्या अंतर्गत शक्ती आहेत.

परस्पर सन्मानाशिवाय अहिंसा पूर्ण होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीचे जीवन आणि प्रतिष्ठा मूल्यवान आहे. सामाजिक किंवा आर्थिक स्थिती, शिक्षण, व्यवसाय, भाषा, लिंग किंवा इतर कोणताही फरक असला तरी मानवी सन्मान कमी-अधिक होत नाही. दुसऱ्याला तुच्छ लेखणे, त्याचे म्हणणे ऐकून घेण्यास नकार देणे किंवा त्याला अपमानित करणे ही अहिंसक वृत्ती नाही. अहिंसा आपल्याला दुसऱ्याशी सहमत होण्याची सक्ती करत नाही; परंतु असहमत असतानाही त्याला माणूस म्हणून सन्मान देण्याची शिकवण देते. सन्मानातून संवाद निर्माण होतो आणि संवादातून संघर्षाचे हिंसक रूप टाळण्याची शक्यता वाढते.

आज अहिंसेचा विचार डिजिटल जगालाही लागू होतो. समाजमाध्यमांवरील प्रतिक्रिया काही क्षणांत मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे अपमानास्पद भाषा, धमक्या, अफवा आणि द्वेषपूर्ण संदेशांचा परिणाम व्यापक होऊ शकतो. प्रत्यक्ष भेटीत आपण वापरणार नाही अशी भाषा पडद्यामागून वापरणेही अहिंसेच्या मूल्यांशी विसंगत आहे. डिजिटल माध्यमांवर प्रश्न विचारणे, टीका करणे किंवा असहमती व्यक्त करणे स्वाभाविक आहे; परंतु व्यक्तीला अपमानित करणे, द्वेष निर्माण करणे किंवा खोटी माहिती पसरविणे हे अहिंसक वर्तन नाही. त्यामुळे आधुनिक काळातील अहिंसा ही डिजिटल जबाबदारीशीही जोडली गेली आहे.

अहिंसा ही केवळ मोठ्या संघर्षांच्या वेळी आठवणारी संकल्पना नसून रोजच्या जीवनातील व्यवहारातून व्यक्त होणारे मूल्य आहे. घरातील मतभेद शांतपणे सोडविणे, दुसऱ्याचे म्हणणे पूर्ण ऐकणे, रागाच्या क्षणी थांबून विचार करणे, चूक झाल्यास क्षमा मागणे, दुसऱ्याची चूक झाल्यास सूड न घेणे आणि कोणाच्या अपमानातून आनंद न मानणे या साध्या कृती अहिंसेला व्यवहारात आणतात. अहिंसा मोठ्या घोषणांपेक्षा अशा छोट्या सवयींमध्ये अधिक स्पष्ट दिसते. व्यक्तीच्या वर्तनातील संयम कुटुंबातील संबंधांवर आणि कुटुंबातील वातावरण समाजातील संबंधांवर परिणाम घडवते. त्यामुळे अहिंसा व्यक्तीपासून व्यापक सामाजिक जीवनाकडे विस्तारत जाणारी प्रक्रिया आहे.

अहिंसेसाठी आत्मपरीक्षणही आवश्यक



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

आहे. आपण दुसऱ्याच्या हिंसेकडे सहज लक्ष देतो; परंतु आपल्या विचारांत, शब्दांत आणि वर्तनात हिंसेची कोणती रूपे आहेत, याचा विचार कमी करतो. एखाद्याला सतत कमी लेखणे, पूर्वग्रहातून निर्णय घेणे, त्याचे म्हणणे ऐकून न घेणे किंवा स्वतःच्या मतालाच अंतिम सत्य मानणे या वृत्तींचे परीक्षण करणे गरजेचे आहे. अहिंसा म्हणजे सतत दुसऱ्याला बदलण्याचा आग्रह नव्हे; तर स्वतःच्या प्रतिक्रियांची जबाबदारी स्वीकारणे होय. स्वतःच्या रागाची, अहंकाराची आणि पूर्वग्रहांची जाणीव झाली की आत्मसंयम विकसित होतो आणि अहिंसक वर्तन अधिक सहज शक्य होते.

अहिंसा आणि शांतता यांचा संबंध जवळचा असला तरी दोन्ही संकल्पना समान नाहीत. संघर्ष बाहेरून थांबला तरी मनात द्वेष आणि वैर कायम असेल तर खरी शांतता निर्माण होत नाही. अहिंसा मनातील वैर कमी करण्याचा आणि संबंधांना सन्मानाची दिशा देण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे शांतता टिकविण्यासाठी केवळ संघर्ष थांबविणे पुरेसे नसून संवाद, परस्पर सन्मान, क्षमा आणि सहअस्तित्वाची भावना विकसित करावी लागते. या अर्थाने अहिंसा ही टिकाऊ शांततेची मानसिक आणि नैतिक पायाभरणी ठरते.

आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाचा उद्देश शिक्षण आणि जनजागृतीच्या माध्यमातून अहिंसेचा संदेश व्यापक समाजापर्यंत पोहोचविणे हा आहे. संयुक्त राष्ट्रांच्या ठरावातून अहिंसेच्या सार्वत्रिक महत्त्वावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे अहिंसा ही कोणत्याही एका समाजापुरती मर्यादित संकल्पना नाही. मानवी प्रतिष्ठेचा आदर, संघर्षाचे शांततामय निराकरण, सहिष्णुता, परस्पर समज आणि दुसऱ्याच्या अधिकारांचा स्वीकार ही तिची सार्वत्रिक मूल्ये आहेत. विविध समाजांमध्ये तिची अभिव्यक्ती वेगवेगळी असली तरी तिच्या केंद्रस्थानी माणूस, त्याची प्रतिष्ठा आणि सन्मानपूर्वक सहअस्तित्व हीच भूमिका आहे.

आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण जीवनात अहिंसेची गरज अधिक जाणवते. मात्र ती केवळ संघर्षाच्या प्रसंगी आठवणारी संकल्पना न राहता रोजच्या जीवनाचा भाग बनली पाहिजे. रागाच्या क्षणी संयम राखणे, मतभेदाच्या वेळी संवाद साधणे, चूक झाल्यास क्षमा मागणे, दुसऱ्याच्या चुकीला सूडाने उत्तर न देणे आणि समोरच्याच्या मानवी प्रतिष्ठेचा आदर करणे यातून अहिंसा प्रत्यक्ष जगता येते. तिचा मार्ग नेहमी सोपा नसला तरी तो माणसाला स्वतःवर नियंत्रण ठेवण्याची आणि इतरांशी अधिक संवेदनशीलतेने वागण्याची संधी देतो.

२ ऑक्टोबरचा आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणूनच केवळ दिनविशेष न राहता आत्मपरीक्षणाचा दिवस ठरावा. अहिंसा म्हणजे हिंसक साधनांचा त्याग करण्याइतकीच मनातील द्वेष कमी करण्याची प्रक्रिया आहे. ती विचारांना व्यापकता, वाणीला संयम आणि कृतीला विवेक देते. ती मतभेदांना वैरात बदलू देत नाही आणि संघर्षाला संवादाची दिशा देते. अहिंसा ही भीतीची भाषा नाही; ती आत्मसंयमाची भाषा आहे. ती निष्क्रियतेची खूण नाही; ती सजग मानवी कृतीची दिशा आहे. आणि ती केवळ हिंसेचा अभाव नसून करुणा, संयम, क्षमा, सन्मान आणि सहअस्तित्व यांवर उभे असलेले जीवनमूल्य आहे.

------------------------

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, शुक्रवार , 02 ऑक्टोबर 2026



# वाढदिवसाचा आनंद रक्तदानातून; प्रेमदास पवार यांच्या उपस्थितीत दारावती तांड्यात भव्य रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## रक्तदान करा, सामाजिक बांधिलकी जपा; जीवन वाचविण्याच्या कार्यात सहभागी व्हा" – प्रेमदास पवार

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

दारावती तांडा आणि परिसरातील नागरिकांनी माझ्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराला दिलेला प्रतिसाद मनापासून समाधान देणारा आहे. रक्तदान हे केवळ दान नसून एखाद्याला जीवनाची आशा देणारे कार्य आहे. भविष्यातही युवकांनी व नागरिकांनी अशा समाजोपयोगी उपक्रमांमध्ये पुढाकार घ्यावा. पात्र रक्तदात्यांनी नियमित रक्तदान करून गरजू रुग्णांच्या मदतीसाठी आपले योगदान द्यावे," असे आवाहन आ. धनंजय मुंडे व अजय मुंडे यांचे विश्ववासू प्रेमदास पवार यांनी केले.

"वाढदिवसानिमित्त शुभेच्छा, सत्कार आणि अनावश्यक खर्च करण्यापेक्षा रक्तदानासारखा समाजोपयोगी उपक्रम राबविणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. आपल्या एका रक्तदानामुळे एखाद्या गरजू व्यक्तीचे प्राण वाचण्यास मदत होऊ शकते," असे प्रतिपादन ऊसतोड कामगार महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष प्रेमदास पवार (बापू) यांनी केले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार, दि. १ ऑक्टोबर रोजी कारभारी चौक, दारावती तांडा येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिराला त्यांनी स्वतः उपस्थित राहून रक्तदात्यांचे कौतुक केले. यावेळी युवकांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत झालेल्या या शिबिरात युवक, सामाजिक कार्यकर्ते, ऊसतोड कामगार बांधव तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत रक्तदान केले. 'रक्तदान श्रेष्ठ दान' या संदेशातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया होणारे तसेच विविध आजारांवर उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी रक्ताची गरज भासत असल्याने रक्तदात्यांचे योगदान मोलाचे ठरते. वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले. "आपले एक रक्तदान कोणाच्या तरी आयुष्यात नवी आशा निर्माण करू शकते," या भावनेतून नागरिकांनी रक्तदानासाठी पुढाकार घेतला. शिबिराच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, परस्पर सहकार्य आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. युवकांसह परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभल्याने शिबिराचे आयोजन यशस्वी झाले. गरजू रुग्णांच्या मदतीसाठी भविष्यातही अशा समाजोपयोगी उपक्रमांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.



## राज्यस्तरीय ज्युडो स्पर्धेसाठी दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलचा दीपक गित्ते याची निवड

**परळी,( प्रतिनिधी )**



शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलची ज्युडो क्रीडा स्पर्धेत चमकदार यश संपादन केले आहे. इयत्ता दहावीतील चि.दिपक गोविंद गित्ते ने १७ वर्षे वयोगटातील जिल्हास्तरीय शालेय ज्युडो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याच्या या यशामुळे राज्यस्तरावर शालेय ज्युडो क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सदर विभागीय स्पर्धा १ ऑक्टोबर रोजी संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत दीपकने कौशल्य, आत्मविश्वास आणि जिद्दीचे दर्शन घडवत उल्लेखनीय कामगिरी केली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्रोत मा.श्री.किरण गित्ते सर (आय.ए.एस.), मुख्यमंत्री सचिव, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, उद्योग व वाणिज्य विभाग, त्रिपुरा सरकार, विवेकानंद यूथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ. उषा किरण गित्ते मॅडम तसेच शाळेचे प्राचार्य डॉ.श्रीकांत पाटील सर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या विद्यार्थ्यांना शाळेच्या क्रीडा विभागातील कु.संघमित्रा हुमने मॅडम, अपर्णा भाटकर मॅडम आणि भरत सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेतील शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांकडून त्यांचे कौतुक होत असून, राज्यस्तरीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## प्रेमदास पवार (बापू) यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव; वैजवाडी येथील सदस्य माणिकराव सानप, केदारी ढाकणे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-**

ऊसतोड कामगार महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष प्रेमदास पवार (बापू) यांच्या वाढदिवसानिमित्त आज शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव झाला.वैजवाडी येथील सदस्य माणिकराव सानप, केदारी ढाकणे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शाल, श्रीफळ, पुष्पहार, पेढा भरून सत्कार करण्यात आला

दारावती तांडा येथील धनंजय मुंडे साहेब व माजी जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे यांचे विश्वासू ऊसतोड कामगार महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष तथा दारावती परिसरातील नागरिकांच्या प्रत्येक अडचणीला धावून जाणारे व्यक्तिमत्त्व मा. श्री. प्रेमदास पवार (बापू) यांच्या वाढदिवसानिमित्त विविध मान्यवरांनी त्यांची भेट घेऊन वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी लमाणतांडा ग्रुप ग्रामपंचायतीचे वैजवाडी येथील सदस्य माणिकराव सानप, केदारी ढाकणे, अंबाजी फड, ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार आदी उपस्थित होते. उपस्थितांनी प्रेमदास पवार (बापू) यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. दारावती व परिसरातील नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव पुढाकार घेणारे म्हणून प्रेमदास पवार यांची परिसरात ओळख असून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छुकांनी त्यांना निरोगी व दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रेमदास पवार (बापू) यांच्या वाढदिवसानिमित्त आज विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटुन तसेच मोबाईल, एसएमएस, व्हाट्सअप आदींच्या माध्यमातुन शुभेच्छा दिल्या. आज सकाळीपासुन रात्री उशीरापर्यंत त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होतच होता. दरम्यान शुभेच्छा देणार्या सर्वांचे प्रेमदास पवार (बापू) यांनी आभार मानले.

## दीपक आसेगावकर यांना 'प्राइड ऑफ विदर्भ ' ने सन्मानित




**महागाव | प्रतिनिधी**

पुसद नगरीचे भूषण, कृषिभूषण श्री. दीपक आसेगावकर यांना गौरव गाथा उपक्रमांतर्गत 'प्राइड ऑफ विदर्भ ' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांना मिळालेला हा सन्मान परिसरातील व पुसदसाठी अभिमानास्पद आहे.

केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नामदार श्री. नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते नागपूर येथील हॉटेल सेंटर पॉईंट येथे रविवारी दि. ६ सप्टेंबर रोजी झालेल्या शानदार व सुरेख कार्यक्रमात हा पुरस्कार दीपक आसेगावकर यांना सपत्नीक प्रदान करण्यात आला. यावेळी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, श्री. प्रमोद काळबांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

श्री दीपक आसेगावकर शिक्षण, कृषी, सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रातील हर हुन्नरी व्यक्तिमत्व असून त्यांचे मैत्रीचे रेशीम धागे मनामनाशी जुळलेले आहे.

मानव सेवा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या कार्याची अमिट छाप उमटली असून पुसदच्या गौरवशाली परंपरेत दीपक भाऊंचे योगदान प्रेरणादायी आहे.



## गाव स्वच्छतेसाठी ग्रामस्थ एकवटले

# नांदडी येथे महाश्रमदान; घंटागाडीचा लोकार्पण सोहळा उत्साहात

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'एक दिन, एक घंटा, एक साथ' या महाश्रमदान अभियानाला अंबाजोगाई तालुक्यातील नांदडी येथे ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामस्थ, महिला, युवक, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येत गावातील चौक, शाळा व मंदिर परिसराची स्वच्छता केली.

या महाश्रमदानात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी, बचत गटातील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' या संकल्पनेतून ग्रामस्थांनी स्वच्छतेचा संदेश दिला.

यावेळी गावातील प्रत्येक कुटुंबाला कचराकुंडीचे वाटप करण्यात आले. तसेच पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून उपलब्ध झालेल्या घंटागाडीचा लोकार्पण सोहळा सरपंच सौ. महादेवी बाळासाहेब देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.



कार्यक्रमास उपसरपंच बालाजी देशमुख, ग्रामपंचायत सदस्य कुलदीप देशमुख, आकाश वाघमारे, उत्तरेश्वर देशमुख, प्रीतम वाघमारे, आशाताई शिवनंदा वाघमारे, अंगणवाडी कर्मचारी, जिल्हा परिषद शाळेच्या सहशिक्षिका प्रत्येकीचमे मॅडम, सीआरपी तसेच ज्येष्ठ नागरिक हरिश्चंद्र वाघमारे, प्रकाश वाघमारे, दगडू साहेब देशमुख, किसन गवळी प्रीती किचमे सहशिक्षिका आदी उपस्थित होते.

वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांनी महाश्रमदानात सहभागी होत ग्रामस्थांना स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले. आगामी काळात नांदडी गावासाठी एक हजार वृक्षांची रोपे उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमात सातत्याने सहभागी राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायत अधिकारी सुनील शिवाजीराव मामाडगे व गटनेते आबासाहेब देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले. ग्रामस्थांच्या सामूहिक सहभागामुळे नांदडी येथे स्वच्छता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.